भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# मळे कामगार अधिनियम, १९५१

( १९५१ चा अधिनियम क्रमांक ६९ )

[ १ नोव्हेंबर १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Plantations Labour Act, 1951

**( Act No. 69 of 1951 )**

[ As in force on 1st November, 1977 ]

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९७८)

किंमत ६० पैसे

२२२

# मळे कामगार अधिनियम, १९५१

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण १ ले

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.
२. व्याख्या.
३. दिवसातील वेळेचा उल्लेख.

### प्रकरण २ रे

#### निरीक्षण कर्मचारीवर्ग

४. मुख्य निरीक्षक व निरीक्षक.
५. निरीक्षकांच्या शक्ती व कार्ये.
६. निरीक्षकांना उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधा.
७. प्रमाणन शल्यचिकित्सक.

### प्रकरण ३ रे

#### आरोग्यासंबंधी उपबंध

८. पिण्याचे पाणी.
९. साफसफाई.
१०. वैद्यकीय सुविधा.

### प्रकरण ४ थे

#### कल्याण

११. आहारगृहे.
१२. पाळणाघरे.
१३. मनोरंजनाच्या सुविधा.
१४. शिक्षणविषयक सुविधा.
१५. गृहनिर्माणविषयक सुविधा.
१६. गृहनिर्माणासंबंधी नियम करण्याची शक्ती.
१७. अन्य सुविधा.
१८. कल्याण अधिकारी.

### प्रकरण ५ वे

#### रोजगाराचे तास व मर्यादा

१९. आठवड्याचे तास.
२०. आठवडी सुट्या.
२१. दैनंदिन विश्रांतीची मध्यंतरे.
२२. कार्यकालविस्तार.
२३. कामाच्या अवधीबाबतची नोटीस.
२४. अल्पवयीन बालकांना कामावर ठेवण्यास मनाई.
२५. स्त्रियांना व बालकांना रात्रपाळीच्या कामावर ठेवणे.
२६. प्रौढेतर कामगारांनी टोकने बाळगावयाची.
२७. पात्रता-प्रमाणपत्र.
२८. वैद्यकीय तपासणी आवश्यक करण्याची शक्ती.

**कलमांचा क्रम**

**कलमे**

## प्रकरण ६ वे

**सवेतन रजा**

२९. प्रकरणाची प्रयुक्ती.
३०. वार्षिक सवेतन रजा.
३१. रजेच्या कालावधीतील वेतन.
३२. रुग्णता व प्रसूती यांविषयीचे लाभ.

## प्रकरण ७ वे

**दंड व प्रक्रिया**

३३. अटकाव.
३४. खोटचा पात्रता-प्रमाणपत्राचा वापर.
३५. कामगारांना कामावर ठेवण्याच्या संबंधातील उपबंधांचे व्यतिक्रमण.
३६. अन्य गुन्हे.
३७. पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर वाढीव शिक्षा.
३८. विवक्षित प्रकरणांमध्ये दायित्वातून नियोक्त्याला सूट.
३९. गुन्ह्यांची दखल घेणे.
४०. अभियोगाची मुदत.

## प्रकरण ८ वे

**संकीर्ण**

४१. निदेश देण्याची शक्ती.
४२. सूट देण्याची शक्ती.
४३. नियम करण्याची सर्वसाधारण शक्ती.

# मळे कामगार अधिनियम, १९५१

( १९५१ चा अधिनियम क्रमांक ६९ )

[ २ नोव्हेंबर, १९५१ ]

मळ्यांतील कामगारांच्या कल्याणाबाबत उपबंध करण्यासाठी आणि तेथील कामाची परिस्थिती विनियमित करण्यासाठी अधिनियम.

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :--

## प्रकरण १ ले

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'मळे कामगार अधिनियम, १९५१' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[१] तो अंमलात येईल.

[२][(४) तो पुढील मळ्यांच्या बाबतीत लागू होईल, ते असे,--

(क) चहा, कॉफी, रबर किंवा सिंकोना यांची लागवड करण्याकरिता वापरण्यात आलेल्या किंवा वापरण्यासाठी योजलेल्या १०.११७ हेक्टर किंवा त्याहून अधिक मोजमापाच्या अशा ज्या जमिनीवर तीस किंवा अधिक व्यक्ती कामाला आहेत किंवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला होत्या अशी कोणतीही जमीन;

(ख) केंद्र शासनाची मान्यता मिळवल्यानंतर राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तसे निदेशित केले असेल तर, अन्य कोणत्याही वनस्पतीची लागवड करण्याकरिता वापरण्यात आलेल्या किंवा वापरण्यासाठी योजलेल्या १०.११७ हेक्टर किंवा त्याहून अधिक मोजमापाच्या अशा ज्या जमिनीवर तीस किंवा अधिक व्यक्ती कामाला आहेत किंवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला होत्या अशी कोणतीही जमीन.

(५) राज्य शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, पोटकलम (४) च्या खंड (क) किंवा खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही वनस्पतीच्या लागवडीकरिता वापरण्यात आलेल्या किंवा वापरण्यासाठी योजलेल्या कोणत्याही जमिनीस या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही उपबंध,--

(क) त्या जमिनीचे मोजमाप १०.११७ हेक्टरपेक्षा कमी असले, किंवा

(ख) त्या जमिनीवर कामाला असलेल्या व्यक्तींची संख्या तीसपेक्षा कमी असली,

तरीही लागू होतील :

परंतु ज्या जमिनीचे मोजमाप १०.११७ हेक्टरपेक्षा कमी असेल किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी ज्या जमिनीवर तीसपेक्षा कमी व्यक्ती कामाला असतील अशा जमिनीच्या संबंधात अशी कोणतीही घोषणा करण्यात येणार नाही.]

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,-- व्याख्या.

(क) "किशोर" याचा अर्थ, जिला पंधरा वर्षे पूर्ण झालेली आहेत, पण अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती असा आहे;

(ख) "प्रौढ" याचा अर्थ, जिला अठरा वर्षे पूर्ण झालेली आहेत अशी व्यक्ती असा आहे;

(ग) "बालक" याचा अर्थ, जिला पंधरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती असा आहे;

(घ) "दिवस" याचा अर्थ, मध्यरात्रीपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी असा आहे;

(ङ) "नियोक्ता" हा शब्द मळ्याच्या संबंधात वापरला असता त्याचा अर्थ, ज्या व्यक्तीचे मळ्याच्या कामकाजावर अंतिम नियंत्रण आहे ती व्यक्ती असा आहे आणि जेथे कोणत्याही मळ्याचे

---

[१] १ एप्रिल, १९५४. पहा उद्देश व कारणे यांचे निवेदन, दिनांक ६ मार्च, १९५४, गॅझेट ऑफ इंडिया, १९५४, भाग दोन, कलम ३, पृष्ठ ५३०.

[२] १९६० चा अधिनियम ३४-कलम ३ द्वारे मूळच्या पोटकलम (४) ऐवजी वरील पोटकलम घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

कामकाज अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सोपवलेले असेल (मग तिला व्यवस्थापन-एजंट, व्यवस्थापक, अधीक्षक म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधलेले असो) तेव्हा अशी अन्य व्यक्ती त्या मळयाच्या संबंधात नियोक्ता असल्याचे मानण्यात येईल;

[1][(ङ्ङ्) "कुटुंब" हा शब्द कामगाराच्या संबंधात वापरण्यात आला असता त्याचा अर्थ,---

(एक) त्याचा किंवा तिचा विवाहसाथी, आणि

(दोन) ज्यांना अठरावे वर्ष पूर्ण झालेले नाही अशी पुरुष किंवा स्त्री कामगारावर अवलंबून असलेली औरस व दत्तक अपत्ये

असा आहे, आणि जेथे कामगार हा पुरुष असेल तेथे त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे आईवडील यांचा त्यात समावेश आहे;]

[2][(च्) "मळा" याचा अर्थ, ज्याला हा अधिनियम पूर्णतः किंवा अंशतः लागू होतो असा कोणताही मळा असा आहे आणि यामध्ये कार्यालये, रुग्णालये, दवाखाने, शाळा आणि अशा मळयाशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारी अन्य कोणतीही वास्तू यांचाही समावेश आहे, परंतु ज्या वास्तूला 'कारखाने अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३) याचे उपबंध लागू होतात त्या वास्तूवरील कोणत्याही कारखान्याचा यात समावेश नाही;]

(छ्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

[3][(ज्) "अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, 'भारतीय वैद्यकीय पदवी अधिनियम, १९१६' (१९१६ चा ७) याच्या कलम ३ खाली विनिर्दिष्ट किंवा अधिसूचित केलेल्या अथवा 'भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०२) याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाद्वारे बहाल करण्यात आलेली अर्हता धारण करणारी व्यक्ती असा आहे आणि यामध्ये, कोणत्याही प्रांतीय किंवा राज्य वैद्यकीय परिषद अधिनियमाखाली दिलेले प्रमाणपत्र धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे;]

(झ) "वेतन" याचा अर्थ, 'किमान वेतन अधिनियम, १९४८' (१९४८ चा १)-कलम २-खंड (ज्) मध्ये दिल्याप्रमाणे आहे;

(ञ्) "आठवडा" याचा अर्थ, शनिवारच्या मध्यरात्रीपासून किंवा कोणत्याही क्षेत्रातील मळयांच्या संबंधात राज्य शासन, त्या क्षेत्रातील संबंधित मळयांना अनुलक्षून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे विचारविनिमय झाल्यानंतर निश्चित करील अशा अन्य दिवसाच्या मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी असा आहे;

[4][(ट्) "कामगार" याचा अर्थ, मळयात कौशल्याचे किंवा बिनकौशल्याचे, अंगमेहनतीचे किंवा कारकुनी काम करण्यासाठी मोलाने किंवा इनामाच्या बदल्यात कामाला ठेवलेली व्यक्ती असा आहे--- मग तिची थेट भरती केलेली असो किंवा कोणत्याही यंत्रणेमार्फत केलेली असो, पण यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होत नाही---

(एक) मळयावर कामाला असलेला वैद्यकीय अधिकारी;

(दोन) जिचे मासिक वेतन तीनशे रुपयांपेक्षा अधिक आहे अशी मळयात कामाला असलेली कोणतीही व्यक्ती (वैद्यकीय कर्मचारीवर्गातील कोणताही कर्मचारी धरून);

(तीन) मळयावर मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय नात्याने कामाला असलेली कोणतीही व्यक्ती--- मग तिचे मासिक वेतन तीनशे रुपयांपेक्षा कमी असले तरी हरकत नाही; किंवा

(चार) इमारती, रस्ते, पूल, गटारे किंवा कालवे यांचे बांधकाम, विकास किंवा देखभाल यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कामासाठी मळयामध्ये तात्पुरती कामाला ठेवलेली कोणतीही व्यक्ती;]

(ठ्) "अल्पवयीन व्यक्ती" याचा अर्थ, जी व्यक्ती बालक तरी आहे किंवा किशोर तरी आहे ती व्यक्ती असा आहे;

---

[1] १९६० चा अधिनियम ३४-कलम ३ द्वारे घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हा-पासून).

[2] कित्ता---कलम ३ द्वारे खंड (च्) ऐवजी घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[3] कित्ता---कलम ३ द्वारे खंड (ज्) ऐवजी घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

[4] कित्ता---कलम ३ द्वारे खंड (ट्) ऐवजी घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

**दिवसातील वेळेचा उल्लेख.**

३. या अधिनियमात दिवसातील वेळेसंबंधीचे उल्लेख हे ग्रीनीच मध्यवेळेपेक्षा साडेपाच तासांनी पुढे असलेल्या भारतीय प्रमाण वेळेचे उल्लेख आहेत :

परंतु जेथे भारतीय प्रमाण वेळ सर्वसाधारणपणे पाळली जात नाही अशा कोणत्याही क्षेत्राकरिता राज्य शासनास––

(क्) क्षेत्र विनिर्दिष्ट करणारे;

(ख्) त्या क्षेत्रामध्ये सर्वसाधारणपणे पाळली जाणारी स्थानिक मध्यवेळ निश्चित करणारे ;

(ग्) त्या क्षेत्रात असलेल्या सर्व किंवा कोणत्याही मळ्यांना अशी वेळ पाळण्याची परवानगी देणारे, नियम करता येतील.

---

## प्रकरण २ रे

### निरीक्षण कर्मचारीवर्ग

**मुख्य निरीक्षक व निरीक्षक.**

४. (१) राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्याकरिता योग्य अर्हताप्राप्त व्यक्तीची मळ्यांचा मुख्य निरीक्षक म्हणून आणि आपणांस योग्य वाटेल तितक्या अर्हताप्राप्त व्यक्तींची मुख्य निरीक्षकाला दुय्यम असणारे मळ्यांचे निरीक्षक, म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) राज्य शासन याबाबतीत करील अशा नियमांच्या अधीनतेने, मुख्य निरीक्षक, कोणत्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये किंवा कोणत्या मळ्यांच्या संबंधात निरीक्षकांना या अधिनियमाखालील आपापल्या शक्तींचा वापर करावा लागेल ते घोषित करू शकेल आणि राज्य शासन त्याला नेमून देईल अशा सीमांमध्ये तो स्वतः निरीक्षकाच्या शक्तींचा वापर करू शकेल.

(३) मुख्य निरीक्षक व सर्व निरीक्षक हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**निरीक्षकांच्या शक्ती व कार्ये.**

५. राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, निरीक्षकाला ज्या स्थानिक सीमांकरिता त्याची नियुक्ती झाली असेल त्या स्थानिक सीमांमध्ये––

(क्) कोणत्याही मळ्याच्या बाबतीत हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधांचे पालन केले जात आहे की नाही याची खातरजमा करून घेण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी तपासणी व चौकशी करता येईल;

(ख्) या अधिनियमाची उद्दिष्टे अंमलात आणण्याकरिता, त्याला योग्य वाटतील असे कोणी मदतनीस असल्यास त्यांच्यासह कोणत्याही मळ्यामध्ये किंवा त्याच्या एखाद्या भागामध्ये कोणत्याही रास्त वेळी प्रवेश करता येईल, निरीक्षण करता येईल किंवा तपासणी करता येईल;

(ग्) कोणत्याही मळ्यात काढलेल्या पिकाची किंवा त्यामध्ये कामाला असलेल्या कामगाराची तपासणी करता येईल किंवा या अधिनियमानुसार ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज हजर करण्याची आज्ञा करता येईल आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता त्याला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या जागच्या जागी किंवा अन्यथा जबान्या घेता येतील;

(घ्) विहित केल्या असतील अशा अन्य शक्तींचा वापर करता येईल :

परंतु या कलमाखाली कोणत्याही व्यक्तीला गुन्ह्यात गोवण्याकडे ज्याचा रोख आहे अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास किंवा अशी कोणतीही जबानी देण्यास तिला भाग पाडले जाणार नाही.

**निरीक्षकांना उपलब्धकरून द्यावयाच्या सुविधा.**

६. प्रत्येक नियोक्ता निरीक्षकाला या अधिनियमाखाली कोणत्याही प्रकारे प्रवेश करण्यास, निरीक्षण करण्यास, तपासणी करण्यास किंवा चौकशी करण्यास सर्व वाजवी सुविधा उपलब्ध करून देईल.

**प्रमाणन शल्यचिकित्सक.**

७. (१) राज्य शासनाला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायींची, राज्य शासन त्यांना अनुक्रमे नेमून देईल अशा स्थानिक सीमांमध्ये किंवा अशा मळ्यांकरिता किंवा अशा मळेवर्गाकरिता प्रमाणन शल्यचिकित्सक म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) प्रमाणन शल्यचिकित्सक पुढील बाबतीत विहित केली असतील अशी कर्तव्ये पार पाडील :––

(क्) कामगारांची तपासणी करणे व त्यांना प्रमाणपत्र देणे;

(ख्) किशोर व बालके यांना ज्यामुळे त्यांच्या आरोग्याला अपाय होण्याची शक्यता आहे असे कोणतेही काम करण्यासाठी कोणत्याही मळ्यामध्ये कामाला ठेवलेले किंवा ठेवण्यात येणार असेल त्या बाबतीत विहित केली जाईल अशी वैद्यकीय देखरेख ठेवणे.

## प्रकरण ३ रे

### आरोग्यासंबंधी उपबंध

पिण्याचे पाणी. ८. प्रत्येक मळचामध्ये मळचातील सोयीस्कर ठिकाणी सर्व कामगारांकरिता आरोग्यप्रद अशा पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याकरिता व तो राखण्याकरिता नियोक्ता सुसज्ज व्यवस्था करील.

साफसफाई. ९. (१) प्रत्येक मळचामध्ये पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी स्वतंत्रपणे विहित प्रकारचे पुरेसे शौचकूप व मुताऱ्या अशा ठिकाणी उपलब्ध करण्यात येतील की ज्या त्या मळचामध्ये कामाला ठेवलेल्या कामगारांना सोयीस्कर होतील व जेथे त्यांना सहजपणे जाता येईल.

(२) पोटकलम (१) खाली उपलब्ध करण्यात आलेलें सर्व शौचकूप व मुताऱ्या स्वच्छ व आरोग्यकारी स्थितीमध्ये ठेवण्यात येतील.

वैद्यकीय सुविधा. १०. (१) प्रत्येक मळचात, कामगारांकरता [1][व त्यांच्या कुटुंबांकरिता] राज्य शासन विहित करील अशा वैद्यकीय सुविधा सहजपणे उपलब्ध होऊ शकतील अशा प्रकारे पुरविण्यात येतील व त्या सुसज्ज ठेवण्यात येतील.

(२) एखाद्या मळचात पोटकलम (१) द्वारे आवश्यक केलेल्या वैद्यकीय सुविधा पुरवण्यात आल्या नसतील किंवा त्या सुसज्ज ठेवण्यात आल्या नसतील तर, मुख्य निरीक्षकाला त्या प्रकारच्या वैद्यकीय सुविधा पुरवण्याची व त्या सुसज्ज ठेवण्याची तजवीज करता येईल व त्यासंबंधीचा खर्च कसूरदार नियोक्त्याकडून वसूल करता येईल.

(३) या वसुलीच्या प्रयोजनार्थ मुख्य निरीक्षक वसूल करावयाचा खर्च जिल्हाधिकाऱ्याला प्रमाणपत्राने कळवू शकेल आणि जिल्हाधिकारी ती रक्कम जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करू शकेल

---

## प्रकरण ४ थे

### कल्याण

आहारगृहे. ११. (१) राज्य शासन, ज्या मळचामध्ये सर्वसाधारणपणे दीडशे कामगार कामावर ठेवण्यात आलेले आहेत त्या प्रत्येक मळचामध्ये कामगारांच्या उपयोगासाठी एका किंवा अधिक आहारगृहांची व्यवस्था करण्यास व ती चालवण्यास नियोक्त्याला आवश्यक करणारे नियम करू शकेल.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, या नियमांद्वारे पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येईल :—

(क) कोणत्या दिनांकापासून आहारगृहाची व्यवस्था करावी लागेल याबाबत;

(ख) किती आहारगृहांची व्यवस्था करावी लागेल आणि आहारगृहांचे बांधकाम, जागा, साजसामान व अन्य सामग्री यांचा दर्जा काय असावा याबाबत;

(ग) तेथे कोणते खाद्यपदार्थ देता येतील आणि त्यासाठी कोणते दर ठेवता येतील याबाबत;

(घ) आहारगृहाकरिता व्यवस्थापकीय समितीची स्थापना व आहारगृहाच्या व्यवस्थापकवर्गामध्ये कामगारांचे प्रतिनिधित्व याबाबत;

(ङ) विहित केल्या असतील अशा शर्तींच्या अधीनतेने, खंड (ग) खाली नियम करण्याच्या शक्तीचे मुख्य निरीक्षकाकडे प्रत्यायोजन याबाबत.

पाळणाघरे. १२. (१) ज्या मळचामध्ये पन्नास किंवा त्याहून अधिक कामगार स्त्रिया कामावर ठेवण्यात आल्या आहेत किंवा मागील बारा महिन्यांमधील कोणत्याही दिवशी कामावर ठेवण्यात आल्या होत्या त्या मळचामध्ये नियोक्त्याला अशा स्त्रियांच्या सहा वर्षांखालील बालकांच्या उपयोगासाठी योग्य खोल्यांची व्यवस्था करावी लागेल व त्या सुस्थितीत ठेवाव्या लागतील.

(२) (क) अशा खोल्यांमध्ये पुरेशी जागा असेल;

(ख) त्यांमध्ये पुरेसा प्रकाश व मोकळी हवा असेल;

(ग) त्या स्वच्छ व आरोग्यकारी स्थितीत ठेवल्या जातील;

(घ) त्या खोल्या बालके आणि अर्भके यांच्या संगोपनाचे प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रीच्या ताब्यात असतील.

(३) राज्य शासनास या खोल्यांचे बांधकाम आणि त्यामध्ये पुरवावयाची साधनसामग्री व सुखसोयी यांच्या संबंधात त्यांचे ठिकाण व दर्जा विहित करणारे नियम करता येतील.

---

[1] १९६० चा अधिनियम ३४-कलम ४ द्वारे घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

१३. राज्य शासन प्रत्येक नियोक्त्याला त्याच्या मळचामध्ये कामाला ठेवण्यात आलेल्या कामगारां-करिता व बालकांकरता विहित केल्या जातील अशा मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध करण्यास आवश्यक करणारे नियम करू शकेल. मनोरंजनाच्या सुविधा.

१४. कोणत्याही मळचामध्ये कामाला ठेवण्यात आलेल्या कामगारांच्या सहा ते बारा वर्षे वयाच्या बालकांची संख्या पंचवीसपेक्षा अधिक असेल तेथे, राज्य शासन प्रत्येक नियोक्त्याला त्या बालकांकरता विहित करण्यात येईल अशा पद्धतीने व अशा दर्जाच्या शिक्षणविषयक सुविधा उपलब्ध करण्यास आवश्यक करणारे नियम करू शकेल. शिक्षणविषयक सुविधा.

१५. मळचामध्ये राहणारा प्रत्येक कामगार व त्याचे कुटुंब यांच्याकरता घरांसाठी आवश्यक ती जागा उपलब्ध करणे व ती सुस्थितीत राखणे हे प्रत्येक नियोक्त्याचे कर्तव्य असेल. गृहनिर्माणविषयक सुविधा.

१६. राज्य शासनास कलम १५ च्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि विशेषत: पुढील गोष्टींचा उपबंध करण्यासाठी नियम करता येतील,–– गृहनिर्माणासंबंधी नियम करण्याची शक्ती.

(क्) पुरवावयाच्या जागेचा दर्जा व विनिर्देशन;

(ख्) घरे बांधण्याकरिता जमिनीची निवड करणे व ती तयार करणे आणि अशा भूखंडाचे आकारमान ठरवणे ;

(ग्) गृहनिर्माणाशी संबंधित असलेल्या बाबींविषयी विचारविनिमय करण्याकरिता, राज्य शासन, नियोक्ता व कामगार यांचे प्रतिनिधी मिळून बनलेली सल्लागार मंडळे घटित करणे व त्यासंबंधात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शक्ती, कार्याधिकार व कर्तव्ये बजावणे;

(घ्) कामगारांना पुरवावयाच्या घरांच्या जागेचे काही भाडे असल्यास त्याचा दर ठरवणे;

(ङ्) कामगार व त्यांची कुटुंबे यांना घरांची जागा व अशा जागेला लागून परसमळा तयार करण्यासाठी योग्य असे रिकाम्या जमिनीचे पट्टे वाटून देणे,[1] * * * आणि अशा जागेतून कामगारांना व त्यांच्या कुटुंबांना काढून टाकणे;

(च्) मळचाच्या ज्या भागांमध्ये कामगारांची घरे असतील तेथे इतरेजनांना प्रवेश असणे.

१७. राज्य शासन, प्रत्येक मळचातील कामगारांना त्यांचा पावसापासून किंवा थंडीपासून बचाव व्हावा यासाठी विहित करण्यात येतील तितक्या व तशा प्रकारच्या छत्र्या, ब्लँकेटे, पावसाळीकोट किंवा त्या-सारख्या अन्य सुविधा पुरवण्यास नियोक्त्याला आवश्यक करणारे नियम करू शकेल. अन्य सुविधा.

१८. (१) जेथे सर्वसाधारणपणे तीनशे किंवा त्याहून अधिक कामगार कामावर ठेवण्यात आले असतील त्या प्रत्येक मळचामध्ये नियोक्ता, विहित करण्यात येतील तितके कल्याण अधिकारी नियुक्त करील. कल्याण अधिकारी.

(२) राज्य शासनाला पोटकलम (१) खाली नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांची कर्तव्ये, अर्हता व सेवाशर्ती विहित करता येतील.

---

## प्रकरण ५ वे

### रोजगाराचे तास व मर्यादा

१९. या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, कोणत्याही प्रौढ कामगाराला कोणत्याही मळचावर एका आठवडचात चौपन्न तासांपेक्षा अधिक वेळ काम करावयास आणि कोणत्याही किशोर किंवा बालक कामगाराला आठवडचातून चाळीस तासांपेक्षा अधिक काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही. आठवडचाचे तास.

२०. (१) राज्य शासनाला याबाबतीत केलेल्या नियमांद्वारा–– आठवडी सुटचा.

(क्) प्रत्येक सात दिवसांच्या कालावधीत एक विश्रांतीचा दिवस देण्याबाबत उपबंध करता येईल आणि तो सर्व कामगारांना द्यावा लागेल;

(ख्) विश्रांतीच्या दिवशी केलेल्या कामाबद्दल, त्या त्या क्षेत्रात प्रचलित असणाऱ्या अतिकालिक दरा-पेक्षा कमी नसेल अशा दराने, व जेथे असा दर प्रचलित नसेल तेथे राज्य शासन याबाबतीत निश्चित करील अशा दराने पैसे देण्याबाबत उपबंध करता येईल.

---

[1] १९६० चा अधिनियम ३४-कलम ५ द्वारे विवक्षित शब्द वगळण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादा कामगार ज्या दिवशी मळाचे काम बंद असते असा सुटीचा दिवस सोडून अन्य कोणत्याही विश्रांतीच्या दिवशी काम करू इच्छीत असेल तर, या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे त्याला तसे करण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु तसे करताना कामगाराने मध्ये संपूर्ण दिवसाची सुटी न घेता सलग दहा दिवसांपेक्षा अधिक दिवस काम करता कामा नये.

**स्पष्टीकरण १.**—तुफान, आग, पाऊस या किंवा अन्य नैसर्गिक कारणांमुळे कोणत्याही मळयावर कोणत्याही दिवशी एखादा कामगार काम करू शकला नसेल तेव्हा, त्याची इच्छा असेल तर, पोटकलम (१) च्या अर्थानुसार, तो दिवस संबद्ध सात दिवसांच्या कालावधीपुरता त्याचा विश्रांतीचा दिवस समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.**—रजेखातर खर्ची घातलेला कोणताही दिवस धरून ज्या कामगाराचा रोजगाराचा एकूण कालावधी सहा दिवसांपेक्षा कमी असेल अशा कोणत्याही कामगाराला या कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

दैनंदिन विश्रांतीची मध्यंतरे.

२१. प्रत्येक दिवसाचा कामाचा कालावधी हा अशा तऱ्हेने निश्चित करण्यात येईल की, जेणेकरून कोणताही कालावधी पाच तासांहून अधिक होणार नाही, आणि प्रत्येक कामगाराला निदान अर्धा तास तरी विश्रांतीचे मध्यंतर मिळाल्याखेरीज पाच तासांहून अधिक काळ काम करावे लागणार नाही.

कार्यकालविस्तार.

२२. मळचामधील प्रौढ कामगाराच्या कामाचा अवधी अशा तऱ्हेने योजला जाईल की, जेणेकरून तो कलम [१][२१] खालील त्याच्या विश्रांतीच्या मध्यंतरासह व कोणत्याही दिवशी कामाच्या प्रतीक्षेमध्ये व्यतीत केलेला वेळ धरून बारा तासांपेक्षा अधिक होणार नाही.

कामाच्या अवधीबाबतची नोटीस.

२३. (१) प्रत्येक मळचामध्ये कामगारांना प्रत्येक दिवशी किती वेळ काम करावे लागेल तो अवधी स्पष्टपणे दर्शवणारी कामाच्या अवधीबाबतची नोटीस विहित असेल अशा नमुन्यात व अशा पद्धतीने लावण्यात येईल व ती बिनचूक ठेवण्यात येईल.

(२) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, मळचामध्ये अवधींबाबत जी नोटीस लावली असेल तिच्याव्यतिरिक्त अन्यथा कोणत्याही कामगाराला कोणत्याही मळचामध्ये काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही.

(३) एखादा कामगार दिवसाच्या कामाला प्रारंभ करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासापेक्षा उशीरा कामावर आल्यास नियोक्ता त्या कामगाराला कामावर ठेवण्यास नकार देऊ शकेल.

अल्पवयीन बालकांना कामावर ठेवण्यास मनाई.

२४. ज्या बालकाला बारा वर्षे पूर्ण झालेली नाहीत त्याला कोणत्याही मळचामध्ये काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही.

स्त्रियांना व बालकांना रात्रपाळीच्या कामावर ठेवणे.

२५. राज्य शासनाच्या परवानगीखेरीज कोणत्याही मळचात मध्यान्हपूर्वे ६ ते मध्यान्होत्तर ७ ही वेळ सोडून एरव्ही कोणत्याही स्त्री किंवा बालक कामगाराला कामावर लावले जाणार नाही:

परंतु या कलमातील कोणतीही गोष्ट, कोणत्याही मळचामध्ये प्रसाविका व परिचारिका म्हणून कामावर ठेवलेल्या स्त्रियांना लागू असल्याचे मानले जाणार नाही.

प्रौढेतर कामगारांनी टोकने बाळगावयाची.

२६. बारा वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याही बालकाला आणि कोणत्याही किशोराला,—

(क) त्याच्यासंबंधात कलम २७ खाली देण्यात आलेले पात्रता प्रमाणपत्र नियोक्त्याच्या ताब्यात असल्याखेरीज; आणि

(ख) असे बालक किंवा असा किशोर, कामावर असताना अशा प्रमाणपत्राचा निर्देश करणारे टोकन स्वतःजवळ बाळगत असल्याखेरीज,

कोणत्याही मळचात काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा देण्यात येणार नाही.

पात्रता प्रमाणपत्र.

२७. (१) कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीने किंवा तिच्या आई-वडिलांपैकी कोणीही किंवा पालकाने अर्ज करून त्यासोबत, अशी व्यक्ती काम करण्यास पात्र असल्याचे प्रमाणित केले गेल्यास तिला मळचामध्ये कामाला ठेवण्यात येईल अशा अर्थाचा नियोक्त्याने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरित केलेला दस्तऐवज जोडलेला असेल तर, किंवा काम करू इच्छिणाऱ्या कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीच्या संदर्भात नियोक्त्याने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने अर्ज केला असेल तर, प्रमाणन शल्यचिकित्सक अशा व्यक्तीची तपासणी करील व बालक म्हणून किंवा किशोर म्हणून काम करण्याची तिची पात्रता निश्चित करील.

---

[१] १९५३ चा अधिनियम ४२-कलम ४ आणि तिसरी अनुसूची या द्वारे " १९ " या आकड्याऐवजी हा आकडा घातला.

(२) या कलमाखाली देण्यात आलेले पात्रताप्रमाणपत्र, त्यावरील दिनांकापासून बारा महिनेपर्यंत विधिग्राह्य असेल, पण त्याचे नूतनीकरण करता येईल.

(३) या कलमाखालील प्रमाणपत्रासाठी प्रदेय असलेली कोणतीही फी नियोक्त्याकडून भरली जाईल आणि ती त्या अल्पवयीन व्यक्तीकडून, तिच्या आई-वडिलांकडून किंवा पालकाकडून वसूल केली जाणार नाही.

२८. निरीक्षकाला तसे करणे आवश्यक वाटल्यास मळ्यामध्ये कामावर ठेवलेल्या कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीची प्रमाणन शल्यचिकित्सकाकडून तपासणी करवून घेता येईल. वैद्यकीय तपासणी आवश्यक करण्याची शक्ती.

---

## प्रकरण ६ वे

## सवेतन रजा

२९. (१) एखादा कामगार अन्य कोणत्याही कायद्याखाली किंवा कोणताही निवाडा, करार किंवा सेवा-संविदा यांच्या अटींखाली ज्याबाबत हक्कदार असेल अशा कोणत्याही अधिकारांना बाध येईल अशा प्रकारे या प्रकरणाचे उपबंध प्रवर्तित होणार नाहीत: प्रकरणाची प्रयुक्ती.

परंतु जेथे अशा निवाड्यात, करारात किंवा सेवा-संविदेत या प्रकरणामध्ये उपबंधित केलेले असेल त्याहून अधिक मुदतीच्या सवेतन रजेबाबत उपबंध करण्यात आले असतील तेथे, कामगार फक्त अशा अधिक मुदतीच्या रजेस हक्कदार असेल.

**स्पष्टीकरण.**— या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, कलम ३० मध्ये उपबंधित केले असेल तेवढे सोडून अन्यथा, या रजेमध्ये आठवडी सुट्यांचे किंवा उत्सवांच्या किंवा तत्सम अन्य प्रसंगांच्या सुट्यांचे दिवस यांचा समावेश असणार नाही.

३०. (१) प्रत्येक कामगाराला— वार्षिक सवेतन रजा.

(क) तो जर प्रौढ असेल तर, त्याने काम केलेल्या प्रत्येक वीस दिवसांमागे एक दिवस, आणि

(ख) तो जर अल्पवयीन व्यक्ती असेल तर, त्याने काम केलेल्या प्रत्येक पंधरा दिवसांमागे एक दिवस,

या प्रमाणात परिगणना करून ठरवलेली सवेतन रजा दिली जाईल:

परंतु या रजेच्या कालावधीमध्ये, अशा कालावधीमध्ये येणाऱ्या कोणत्याही सुटीचा समावेश असेल.

[1][**स्पष्टीकरण.**— या पोटकलमाखाली रजेची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ,—

(क) ज्या दिवशी काम केले नसेल किंवा अर्ध्या दिवसापेक्षा कमी वेळ काम केले असेल असा कोणताही दिवस धरला जाणार नाही; आणि

(ख) ज्या कोणत्याही दिवशी अर्धा दिवस किंवा अर्ध्या दिवसापेक्षाही जास्त काम केलेले असेल तो एक दिवस म्हणून धरला जाईल.]

(२) एखाद्या कामगाराने बारा महिन्यांच्या कोणत्याही एका कालावधीत पोटकलम (१) खाली अनुज्ञेय असलेली संपूर्ण रजा घेतली नाही तर, त्याने न घेतलेली कोणतीही रजा पुढील बारा महिन्यांच्या कालात त्या पोटकलमाखाली त्याला अनुज्ञेय असलेल्या रजेमध्ये मिळवली जाईल.

(३) एखाद्या कामगाराला देय असलेली अर्जित रजा तीस दिवस इतकी भरेल तेव्हा, त्याला या कलमाखाली कोणतीही रजा अर्जित होण्याचे बंद होईल.

[1][(४) या कलमाखाली रजेस हक्कदार असलेल्या कामगाराची नोकरी तो ज्या रजेला हक्कदार असेल ती संपूर्ण रजा त्याने घेण्यापूर्वीच नियोक्त्याने समाप्त केली तर, नियोक्ता न घेतलेल्या रजेच्या संबंधात कलम ३१ खाली प्रदेय असलेली रक्कम त्याला देईल, आणि असे प्रदान हे अशा समाप्तीनंतरचा कामाचा दुसरा दिवस संपण्यापूर्वी करण्यात येईल.]

३१. [2][(१) कामगाराला कलम ३० खाली अनुज्ञेय असलेल्या रजेबद्दल— रजेच्या कालावधीतील वेतन.

(क) जर त्याला संपूर्णतया वेळेवारी दराच्या तत्त्वावर कामावर ठेवले असेल तर, अन्य कोणत्याही कायद्याखाली किंवा कोणताही निवाडा, करार किंवा सेवा-संविदा यांच्या अटींखाली अशा रजेच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी त्याला प्रदेय असलेल्या दैनिक वेतनाच्या दराने, आणि

---

[1] १९६० चा अधिनियम ३४-कलम ६ द्वारे घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व व तेव्हापासून).

[2] १९६० चा अधिनियम ३४-कलम ७ द्वारे पोटकलम (१) ऐवजी घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

(ख्) जेथे मागील बारा कॅलेंडर महिन्यांमध्ये त्याला अंशतः वेळेवारी दराच्या तत्त्वावर व अंशतः कामावारी दराच्या तत्त्वावर वेतन देण्यात आले असेल अशा प्रकरणांसह अन्य प्रकरणांमध्ये, मागील बारा कॅलेंडर महिन्यांमधील एकंदर वेतनाची परिगणना करून ठरवलेल्या सरासरी दैनिक वेतनाच्या दराने

पैसे दिले जातील.

**स्पष्टीकरण.**—पोटकलम (१)-खंड (ख्) च्या प्रयोजनार्थ, मागील बारा कॅलेंडर महिन्यांमध्ये कोणतीही अतिकालिक कामाबद्दलची कमाई किंवा बोनस असल्यास ते वगळून, पण महागाईभत्ता धरून त्याला जी एकूण पूर्णवेळ कमाई झाली असेल तिच्या आधारावर परिगणना करून सरासरी दैनिक वेतन ठरवले जाईल.

(१क) कामगाराला पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने रजामुदतीकरिता द्यावयाच्या वेतनाबरोबरच नियोक्त्याकडून त्याला काही भोजनाची सोय किंवा अन्य सवलती दिल्या जात असतील त्या बाबतीत, या सवलती रजामुदतीतही चालू ठेवल्या नसतील तर त्यांची रोख किंमत त्याला देण्यात येईल.]

(२) कलम ३० खाली ज्या कामगाराला, तो प्रौढ असेल तर चार दिवसांपेक्षा व तो अल्पवयीन असेल तर पाच दिवसांपेक्षा [1][कमी नाही अशा] कोणत्याही कालावधीपर्यंत रजा देण्यात आली असेल त्या कामगाराला त्याची रजा सुरू होण्यापूर्वी त्याला दिलेल्या रजेच्या कालावधीचे त्याचे वेतन देण्यात येईल.

रुग्णता व प्रसूती यांविषयीचे लाभ. [2]३२. (१) या बाबतीत केलेले असतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, विहित असेल अशा दराने, अशा कालावधीकरिता व अशा कालांतरागणिक प्रत्येक कामगार आपल्या नियोक्त्याकडून—

(क्) अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने प्रमाणित केलेल्या आजाराच्या बाबतीत रुग्णता भत्ता; आणि

(ख्) ती स्त्री असल्यास, आपल्या प्रसूतीच्या किंवा अपेक्षित प्रसूतीच्या बाबतीत प्रसूति भत्ता

मिळण्यास हक्कदार असेल.

(२) राज्य शासनाला, रुग्णता व प्रसूति भत्त्यांचे प्रदान विनियमित करणारे नियम करता येतील व अशा नियमांमध्ये, असा भत्ता कोणत्या परिस्थितीत दिला जाणार नाही किंवा देण्याचे थांबवण्यात येईल ते विनिर्दिष्ट करता येईल आणि या कलमाखाली नियम करताना राज्य शासन, कोणत्याही मळ्यामध्ये नियोक्ता कोणत्या वैद्यकीय सुविधा पुरवू शकेल ते यथायोग्यपणे विचारात घेईल.

---

## प्रकरण ७ वे

## दंड व प्रक्रिया

अटकाव. **३३.** (१) जो कोणी निरीक्षकाला तो या अधिनियमाखाली आपली कर्तव्ये पार पाडीत असताना अटकाव करील किंवा कोणत्याही मळ्याच्या संबंधात या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्राधिकृत केलेले कोणतेही निरीक्षण, तपासणी किंवा चौकशी करण्याकरिता त्या निरीक्षकाला कोणतीही वाजवी सुविधा देण्याचे नाकारील किंवा त्या कामी बुद्धिपुरःसर उपेक्षा करील तो, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) जो कोणी या अधिनियमानुसार ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज, निरीक्षकाने मागणी केली असता हजर करण्यास बुद्धिपुरःसर नकार देईल अथवा निरीक्षक या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्यांच्या अनुरोधाने कृती करीत असताना कोणत्याही व्यक्तीला त्याच्यापुढे हजर होण्यास किंवा त्याच्याकडून तपासणी केली जाण्यास प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्यामुळे तसा प्रतिबंध होणे संभवनीय आहे असे समजण्यास त्याला कारण असेल असे काहीही करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य-दंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

खोट्या पात्रता-प्रमाणपत्राचा वापर. **३४.** जो कोणी कलम २७ खाली दुसऱ्या व्यक्तीला देण्यात आलेल्या पात्रता-प्रमाणपत्राचा त्या कलमा-खाली स्वतःला मिळालेले प्रमाणपत्र म्हणून जाणूनबुजून वापर करील किंवा वापरण्याचा प्रयत्न करील किंवा स्वतःला मिळालेले पात्रता-प्रमाणपत्र जाणूनबुजून अन्य व्यक्तीला वापरू देईल किंवा वापरण्याचा प्रयत्न करू देईल तो, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पन्नास रुपयांपयत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

---

[1] १९५३ चा अधिनियम ४२-कलम ४ आणि तिसऱ्या अनुसूचीद्वारे " ...... पेक्षा कमी अशा कोणत्याही कालावधीपर्यंत " याऐवजी घातले.

[2] ' प्रसूति विषयक लाभ अधिनियम, १९६१ ' (१९६१ चा ५३) हा, त्याच्या कलम १(३) मध्ये निर्देशिलेल्या राज्यातील आस्थापनांच्या संबंधात राज्यामध्ये अंमलात आणल्यानंतर, कलम ३२ पुढीलप्रमाणे विशोधित केले जाईल :— (क) पोटकलम (१) मधील, "आजाराच्या बाबतीत" या शब्दांआधीचा "(क्)" हा कंस, "रुग्णता भत्ता" या शब्दानंतरचा "आणि" हा शब्द आणि खंड (ख्) वगळण्यात आला; (ख) पोटकलम (२) मधील "किंवा प्रसूति" हे शब्द वगळण्यात आले.

३५. या अधिनियमाचा किंवा त्याखाली केलेल्या नियमांचा जो उपबंध मळयामध्ये माणसे कामावर ठेवण्याबाबत प्रतिबंध करणारा, त्यावर निर्बंध घालणारा किंवा त्याचे विनियमन करणारा असेल त्याचे जो कोणी या अधिनियमानुसार किंवा त्याखाली अनुज्ञेय असेल त्याहून अन्य प्रकारे व्यतिक्रमण करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. कामगारांना कामावर ठेवण्याच्या संबंधातील उपबंधांचे व्यतिक्रमण.

३६. जर कोणी या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण केले आणि त्याबद्दल या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली इतरत्र अन्य कोणत्याही शिक्षेचा उपबंध केलेला नसेल तर, तो तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल. अन्य गुन्हे.

३७. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याबद्दल दोषी ठरविलेल्या एखाद्या व्यक्तीने पुन्हा त्याच उपबंधाचे व्यतिक्रमण अंतर्भूत असलेला गुन्हा केला तर, ती व्यक्ती नंतरच्या दोषसिद्धीअंती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल : पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर वाढीव शिक्षा.

परंतु या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्याबद्दल शिक्षा दिली जात असेल तो गुन्हा घडल्याच्या दोन वर्षे आधी झालेल्या कोणत्याही दोषसिद्धीची दखल घेतली जाणार नाही.

३८. या अधिनियमाखाली एखाद्या गुन्ह्याचा दोषारोप ठेवण्यात आलेला नियोक्ता जेव्हा प्रत्यक्षात दुसरीच व्यक्ती गुन्हेगार असल्याचे अभिकथित करील तेव्हा, नियोक्त्याने याबाबतीत तक्रार केल्यास, त्या अन्य व्यक्तीला अभियोगाच्या सुनावणीसाठी नियत केलेल्या दिवशी न्यायालयापुढे आणावयाचा आपला उद्देश कळवणारी तीन पूर्ण दिवसांची लेखी नोटीस नियोक्त्याने अभियोक्त्याला दिल्यावर तो तसे करण्यास हक्कदार होईल आणि गुन्हा घडल्याचे शाबीत झाल्यानंतर जर नियोक्त्याने न्यायालयाची खात्री होईल अशाप्रकारे असे शाबीत केले की,–– विवक्षित प्रकरणांमध्ये दायित्वातून नियोक्त्याला सूट.

(क) त्याने या अधिनियमाच्या संबद्ध उपबंधांच्या अंमलबजावणीकरिता यथायोग्य तत्परता दाखवलेली आहे; आणि

(ख) त्या अन्य व्यक्तीने केलेला प्रस्तुत गुन्हा हा त्याच्या नकळत करण्यात आला आहे किंवा त्याला त्याची संमती किंवा मूकानुमती नव्हती,

तर उक्त अन्य व्यक्ती गुन्ह्याबद्दल दोषी ठरवण्यात येईल आणि ती जणू काही नियोक्ता असावी त्याप्रमाणे शिक्षेस पात्र होईल आणि नियोक्त्याला दोषमुक्त करण्यात येईल :

परंतु––

(क) नियोक्त्याची शपथेवर तपासणी करता येईल आणि त्याचा साक्षीपुरावा किंवा आपल्या पुष्टचर्थ तो ज्या कोणत्याही साक्षीदाराला बोलावील त्याचा साक्षीपुरावा हा, जी व्यक्ती प्रत्यक्ष गुन्हेगार असल्याचा दोषारोप नियोक्ता करीत असेल अशा व्यक्तीच्या वतीने व अभियोक्त्याकडून उलटतपासणी होण्यास पात्र असेल; आणि

(ख) जर यथायोग्य तत्परता दाखवूनदेखील गुन्हेगार म्हणून अभिकथित केलेली व्यक्ती, अभियोगाच्या सुनावणीकरता नियत केलेल्या दिवशी न्यायालयासमोर उपस्थित करता आली नाही तर, न्यायालय त्यासंबंधीची सुनावणी वेळोवेळी तहकूब करील, तथापि अशा तहकुबीचा एकूण कालावधी तीन महिन्यांपेक्षा अधिक होता कामा नये आणि जर उक्त कालावधीच्या शेवटपर्यंतही प्रत्यक्ष गुन्हेगार म्हणून अभिकथित केलेली व्यक्ती न्यायालयाच्या समोर उपस्थित करता आली नाही तर, न्यायालय नियोक्त्याच्या विरुद्ध बाजूच्या सुनावणीस सुरुवात करील.

३९. मुख्य निरीक्षकाकडून किंवा त्याच्या लेखी पूर्वमंजुरीने तक्रार करण्यात आल्याखेरीज कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्याची दखल घेणार नाही आणि इलाखा-शहर दंडाधिकारी किंवा द्वितीय वर्ग दंडाधिकारी यांच्याहून कमी दर्जा असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही. गुन्ह्यांची दखल घेणे.

४०. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासंबंधी, अभिकथित गुन्हा घडल्याचे निरीक्षकाला कळल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत त्यासंबंधी तक्रार केलेली होती किंवा केलेली आहे असे झाल्याशिवाय कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही : अभियोगाची मुदत.

परंतु गुन्ह्यामध्ये निरीक्षकाने दिलेल्या लेखी आदेशाच्या अवज्ञेचा समावेश असेल त्या बाबतीत तो गुन्हा ज्या दिनांकास घडला असल्याचे अभिकथित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्या बाबतची तक्रार करता येईल.

## प्रकरण ८ वे

### संकीर्ण

निदेश देण्याची शक्ती.

४१. केंद्र शासन कोणत्याही राज्याला या अधिनियमातील उपबंधांची त्या राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत निदेश देऊ शकेल.

सूट देण्याची शक्ती.

४२. राज्य शासन, त्याला ज्या शर्ती किंवा निबंध घालणे उचित वाटेल त्यांच्या अधीनतेने कोणत्याही नियोक्त्याला किंवा कोणत्याही वर्गाच्या नियोक्त्यांना या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही उपबंधां-पासून सूट देऊ शकेल :

परंतु [1][कलम १९ पासून दिलेली सूट सोडून अन्य] अशी कोणतीही सूट केंद्र शासनाच्या पूर्व-मान्यतेखेरीज देता येणार नाही.

नियम करण्याची सर्वसाधारण शक्ती.

४३. (१) राज्य शासनाला पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील :

परंतु ‘सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७’ (१८९७ चा १०)-कलम २३ च्या खंड (३) खाली विनिर्दिष्ट करावयाचा दिनांक हा, ज्या दिनांकी प्रस्तावित नियमांचा मसुदा प्रकाशित झाला त्या दिनांका-पासून सहा आठवड्यांपेक्षा अलिकडचा असता कामा नये.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा कोणत्याही नियमांद्वारे पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येतील :—

(क) मुख्य निरीक्षक व निरीक्षक यांच्या बाबतीत आवश्यक असलेल्या अर्हता;

(ख) निरीक्षकांना कोणत्या शक्ती वापरता येतील व अशा शक्ती कोणत्या क्षेत्रांमध्ये व कोणत्या रीतीने वापरता येतील ;

(ग) प्रमाणन शल्यचिकित्सकांना कोणत्या प्रकारे वैद्यकीय देखरेख ठेवता येईल ;

(घ) मळ्यातील पिण्याच्या पाण्याचा साठा व वाटप याची निरीक्षकांनी किंवा अन्य व्यक्तींनी करावयाची तपासणी;

(ङ) मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक यांच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध करावयाची अपिले आणि अशी अपिले कोणत्या नमुन्यात, किती मुदतीत आणि कोणत्या प्राधिकरणांकडे दाखल करता येतील;

(च) या अधिनियमाद्वारे ज्या गृहनिर्माणविषयक, क्रीडाविषयक, शिक्षणविषयक सुविधांची किंवा अन्य सुविधांची तरतूद करावी लागते व त्या राखाव्या लागतात त्यांची किती मुदतीत याप्रमाणे तरतूद करता येईल;

(छ) मळ्यांमध्ये कोणत्या प्रकारचे शौचकूप व मुताऱ्या ठेवावयाच्या ;

(ज) मळ्यांमध्ये पुरवावयाच्या वैद्यकीय, मनोरंजनविषयक व शिक्षणविषयक सुविधा ;

(झ) कामाच्या अवधीबाबतच्या नोटिसा कोणत्या नमुन्यात व कशा रीतीने प्रदर्शित करावयाच्या व व्यवस्थित राखावयाच्या ;

(ञ) नियोक्त्यांनी ठेवावयाच्या नोंदवह्या आणि राज्य शासनाच्या मते, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील ती प्रासंगिक वा नियतकालिक प्रतिवेदने; आणि

(ट) वेतन व अतिकालिक कामाचा मोबदला यांच्या प्रयोजनार्थ सर्वसाधारण कामाच्या दिवसातील कामाचे तास.

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम जर केंद्र शासनाहून अन्य कोणत्याही शासनाने केलेले असतील तर, ते केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेच्या अधीन असतील.

---

[1] १९६० चा अधिनियम क्रमांक ३४-कलम ८ द्वारे घालण्यात आले (२१ नोव्हेंबर, १९६० रोजी व तेव्हापासून).

## THE PLANTATIONS LABOUR ACT, 1951

## मळे कामगार अधिनियम, १९५१

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| adolescent | किशोर | [S.2 (*a*)] |
| adult | प्रौढ | [S.2 (*b*)] |
| average daily wage | सरासरी दैनिक वेतन | [S.31 (*1*) (*b*)] |
| canteens | आहारगृहे | [S.11] |
| certificate of fitness | पात्रता प्रमाणपत्र | [S.26] |
| certifying surgeon | प्रमाणन-शल्यचिकित्सक | [S.7 (*1*)] |
| child | बालक | [S.2 (*c*)] |
| children & infants | बालके आणि अर्भके | [S.12 (*2*) (*d*)] |
| connivance | मूकानुमती | [S.38] |
| creches | पाळणाघरे | [S.12] |
| day of rest | विश्रांतीचा दिवस | [S.20 (*1*)] |
| earned leave | अर्जित रजा | [S.30 (*3*)] |
| employer | नियोक्ता | [S.2 (*e*)] |
| for hire or reward | मोलाने किंवा इनामाच्या बदल्यात | [S.2 (*k*)] |
| Greenwich Mean Time | ग्रीनीच मध्य वेळ | [S.3] |
| Indian Standard Time | भारतीय प्रमाण वेळ | [S.3] |
| kitchen garden | परसमळा | [S.16 (*e*)] |
| leave not taken | न घेतलेली रजा | [S.30 (*4*)] |
| maintain | सुसज्ज ठेवणे | [S.10 (*1*)] |
| maternity allowance | प्रसूति भत्ता | [S.32 (*1*) (*b*)] |
| night work | रात्रपाळीचे काम | [S.25] |
| period of work | कामाचा अवधी | [S.23] |
| piece rate basis | कामावारी दराचे तत्त्व | [S.31 (*1*) (*b*)] |
| plantation | मळा | [S.2 (*f*)] |
| sickness allowance | रुग्णता भत्ता | [S.32 (*1*) (*a*)] |
| spread over | कार्यकालविस्तार | [S.22-m.n.] |
| time rate basis | वेळेवारी दराचे तत्त्व | [S.31 (*1*) (*a*)] |
| tokens | टोकने | [S.26] |
| wages | वेतन | [S.2 (*i*)] |
| worker | कामगार | [S.2 (*k*)] |
| young person | अल्पवयीन व्यक्ती | [S.2 (*l*)] |

# मळे कामगार अधिनियम, १९५१

# THE PLANTATIONS LABOUR ACT, 1951

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अर्जित रजा | earned leave | [S.30 (*3*)] |
| अल्पवयीन व्यक्ती | young person | [S.2 (*l*)] |
| आहारगृहे | canteens | [S.11] |
| कामगार | worker | [S.2 (*k*)] |
| कामाचा अवधी | period of work | [S.23] |
| कामावारी दराचे तत्त्व | piece rate basis | [S.31 (*1*) (*b*)] |
| कार्यकालविस्तार | spread over | [S.22-m.n.] |
| किशोर | adolescent | [S.2 (*a*)] |
| ग्रीनीच मध्य वेळ | Greenwich Mean Time | [S.3] |
| टोकने | tokens | [S.26] |
| न घेतलेली रजा | leave not taken | [S.30 (*4*)] |
| नियोक्ता | employer | [S.2 (*e*)] |
| परसमळा | kitchen garden | [S.16 (*e*)] |
| पात्रताप्रमाणपत्र | certificate of fitness | [S.26] |
| पाळणाघरे | creches | [S.12] |
| प्रमाणन शल्यचिकित्सक | certifying surgeon | [S.7 (*1*)] |
| प्रसूति भत्ता | maternity allowance | [S.32 (*1*) (*b*)] |
| प्रौढ | adult | [S.2 (*b*)] |
| बालक | child | [S.2 (*c*)] |
| बालके व अर्भके | children & infants | [S.12 (*2*) (*d*)] |
| भारतीय प्रमाण वेळ | Indian Standard Time | [S.3] |
| मळा | plantation | [S.2 (*f*) |
| मूकानुमती | connivance | [S.38] |
| मोलाने किंवा इनामाच्या बदल्यात | for hire or reward | [S.2 (*k*)] |
| रात्रपाळीचे काम | night work | [S.25] |
| रुग्णता भत्ता | sickness allowance | [S.32 (*1*) (*a*)] |
| विश्रांतीचा दिवस | day of rest | [S.20 (*1*)] |
| वेतन | wages | [S.2 (*i*)] |
| वेळेवारी दराचे तत्त्व | time rate basis | [S.31 (*1*) (*a*)] |
| सरासरी दैनिक वेतन | average daily wage | [S.31 (*1*) (*b*)] |
| सुसज्ज ठेवणे | maintain | [S.10 (*1*)] |

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई